**P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad**
**Address:- Office Of The Commissioner Of Police ,**
**Premlok Park Chinchwad,**
**Maharashtra - 411033**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट** **दिनांक – ११/१०/२०२४**

**पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय इमारत मंजुर संकल्प चित्र, नवनिर्मीत ०४ पोलीस स्टेशन तसेच सायबर पोलीस स्टेशन यांचे ऑनलाईन पध्दतीने उदघाटन व लोकार्पण सोहळा.**

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे इमारतीसाठीची दिर्घ प्रतिक्षा अखेर श्री विनयकुमार चौबे पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड यांचे अथक प्रयत्नातून आज रोजी संपली. चिखली येथील ०९ एकर जागेवर बांधणेत येणारी अव्दितीय व अत्याधुनिक सुविधासह सुसज्ज अशी वर्तुळाकार इमारतीचे मंजुर संकल्प चित्र WALK THROUGH व्हिडीओव्दारे अनावरण करण्यात आले आहे.

गुन्हे तपास व गुन्हे प्रतिबंध या अनुषंगाने तसेच नागरिकांच्या सोयीच्या दृष्टीने पिंपरी पोलीस स्टेशनचे विभाजन करून संत तुकाराम नगर पोस्टे, भोसरी पोलीस स्टेशन मधुन दापोडी,वाकड पोलीस स्टेश्न मधुन काळेवाडी तसेच हिंजवडी पोलीस स्टेशन मधुन बावधन पोलीस स्टेशन या नवनिर्मीत ०४ पोलीस स्टेशनचे उदघाटन,वाढते सायबर गुन्हयांना प्रतिबंध होणेकामी व दर्जेदार तपासाचे दृष्टीकोनातुन पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालया अतंर्गत सायबर पोलीस स्टेशन तसेच अभिलेखावरिल गुन्हेगांरावर देखरेख ठेवणेसाठी व नाकाबंदी, पेट्रोलींग इ.वर परिणामकारक देखरेख ठेवणेकरिता कृत्रिम बुध्दीमत्तेचा (**A-I**) वापर करून तयार करण्यात आलेल्या (**PC-CITY SHIELD**) या ॲपचा आज रोजी मा.देवेंद्र फडणवीस, गृहमंत्री तथा उप मुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य यांचे शुभहस्ते उदघाटन व लोकार्पण सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीत पार पाडला.

सदर कार्यक्रम हा पुणे शहर पोलीस मुख्यालयाचे मैदानावर मा.श्री मुरलीधर मोहोळ हवाई उड्डयण व सहकार राज्य मंत्री (भारत सरकार) मा. खासदार मेघा कुलकर्णी, आमदार मा.श्री भिमराव तापकीर, आमदार मा.अमीत गोरखे, आमदार मा.सुनिल टिंगरे,आमदार मा.योगेश टिळेकर,आमदार राम शिंदे,आमदार उमाताई खापरे, श्री संजयकुमार वर्मा पोलीस महासंचालक (न्यायिक व तांत्रिक) मा.पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड श्री विनय कुमार चौबे,पोलीस आयुक्त पुणे शहर श्री अमितेश कुमार,सह पोलीस आयुक्त पिं-चि डॉ. शशिकांत महावरकर, अपर पोलीस आयुक्त श्री वसंत परदेशी, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे) श्री संदिप डोईफोडे,पोलीस उप-आयुक्त परि-२ विशाल गायकवाड,पोलीस उप-आयुक्त परि- १ स्वप्ना गोरे, पोलीस उप-आयुक्त (वाहतुक) श्री बापू बांगर, पोलीस उप-आयुक्त परि-३ डॉ.शिवाजी पवार, इ.उपस्थित होते.

> पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाची इमारत ही कदाचित देशातील सर्वात आधुनिक अशा प्रकारची इमारत असणार आहे.
> **(श्री देवेंद्र फडणवीस गृहमंत्री तथा उप मुख्यमंत्री,महाराष्ट्र)**

**(जनसंपर्क अधिकारी)**
पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय